# मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

**प्रकल्पाचे उद्दिष्ट**

लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून शेतमालाच्या सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक मूल्यसाखळ्यांच्या विकासासाठी मदत करणे.

## मुल्यसाखळी म्हणजे काय?

मुल्यसाखळी म्हणजे शेतमालाच्या उत्पादनापासून उपभोगापर्यंत सर्व कार्याची व ती कार्ये करणाऱ्या सर्व घटकांची साखळी होय. या साखळीमुळे उत्पादित शेतमालाची मालकी एक घटकापासून दुसऱ्या घटकाकडे जाते आणि या प्रक्रियेत शेतमालाच्या किंमतीत वाढ (मुल्यवृध्दी) होत जाते.

## मुलयसाखळी विकास कशासाठी ?

- ग्राहकाने अदा केलेल्या रुपयामध्ये उत्पादकाचा हिस्सा वाढविणे.
- मुल्य साखळीमध्ये सहभागी असलेल्या घटकांची कार्यक्षमता वाढविणे
- सहभागी घटकांमध्ये समन्वय आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करणे
- मूल्यसाखळी स्पर्धाक्षम बनवणे.

## प्रकल्पाची किंमत व निधीचे स्त्रोत

| निधीचे स्त्रोत | रक्कम (रु.कोटी) | रक्कम (दश लक्ष $) | % |
|---|---|---|---|
| जागतिक बँकेचे कर्ज | १४७० | २१० | ७० |
| राज्य शासनाचा हिस्सा | ५६० | ८० | २७ |
| खाजगी उद्योगक्षेत्राच्या माध्यमातून (सीएसआर) | ७० | १० | ३ |
| प्रकल्पाची एकुण किंमत | २१०० | ३०० | १०० |